पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८,
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/१४/कावि/283 /२०२४
दि. 11 / 07 /२०२४

**विषय :-** आश्वासित प्रगती योजना / सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू करताना यापूर्वी विवक्षित सेवा कालावधीनंतर, अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचनेचा मंजूर करणेत येणारा लाभ हा योजनेखालील समजणेत येणारा पहिला व दुसरा लाभ न समजता नियमित लाभाप्रमाणे १२/२४ व १०/२०/३० वर्षानंतर लागू करणेत आलेल्या वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीच्या **दिनांकात व वेतनश्रेणीत** बदल करणेबाबत.

(उदा. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी) इत्यादी पदावरील **पदविका धारक** कर्मचाऱ्यांना विहीत सेवाकाळ पूर्ण केल्यानंतर लागू करणेत येणारी 'शाखा अभियंता' पदाची वरिष्ठ वेतनश्रेणी)

परिपत्रक,

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही/प्र.क्र.१/९५/बारा, दिनांक ८ जून १९९५ अन्वये गट "क" व "ड" (वर्ग ३ व ४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासंबंधी दि.०१ ऑक्टोबर १९९४ पासुन अंमलात आलेली कालबध्द योजना बंद करुन दिनांक २० जुलै २००१ च्या शासन निर्णयानुसार सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागु करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासननिर्णय क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा ३ दि. १ एप्रिल २०१० अन्वये सदर योजना सुधारीत स्वरुपात "सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" या नावाने दि.०१ ऑक्टोबर २००६ पासुन अंमलात आली आहे.

सातव्या वेतन आयोगामध्ये, तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक: वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३ दि.०२ मार्च २०१९ च्या शासन निर्णयान्वये ही योजना दि.०१/०१/२०१६ पासुन अंमलात आली असुन लेखा विभागाकडील आदेश क्र. लेखा/३/कावि/१३३/२०२० दि.१८/०५/२०२० अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचाऱ्यांस तीन लाभाची योजना लागु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

**महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. वेतन-२०२३/प्र.क्र.१०/सेवा-३ दि. २१ फेब्रुवारी, २०२४ अन्वये सदर योजना लागू करण्याबाबतच्या दि. ०१ एप्रिल २०१० व ०२ मार्च २०१९ च्या शासन निर्णयात पुढीलप्रमाणे सुधारणा करणेत आलेली आहे.**

१) वित्त विभागाच्या क्रमांक: वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३,दि.०१.०४.२०१० रोजीच्या शासननिर्णयातील परिच्छेद क्रमांक २(ब)(३) " विवक्षित सेवा कालावधीनंतर संबंधित पदाच्या कर्तव्ये व जबाबदारीत वाढ न होता अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचनेचा (Non-Fuctional Pay Structure) मंजूर करण्यात आलेला/ येणारा, लाभ, हा या योजनेखालील पहिला लाभ समजण्यात येईल, उदा. मंत्रालय/विधानमंडळ सचिवालय कक्ष अधिकाऱ्यांना चार वर्षाच्या सेवेनंतर देण्यात येत असलेली अकार्यात्मक वेतनसंरचना" **हा परिच्छेद पूर्णत: वगळण्यात आला आहे.**

२) **तसेच** वित्त विभागाच्या क्रमांक: वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३,दि.०१.०४.२०१० रोजीच्या शासननिर्णयातील परिच्छेद क्रमांक २(क)(१) मधील " तथापि, या योजनेतील पहिला लाभ म्हणून ज्या पदाची वेतनसंरचना मंजुर करण्यात आली आहे त्या पदाला विवक्षित सेवाकालावधीनंतर, त्या पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांत वाढ न होता, अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतनसंरचना मंजूर

करण्यात येत असेल तर ती अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतनसंरचना दुसरा लाभ म्हणून मंजूर करण्यात येईल." हे **वाक्य वगळण्यात आले आहे.**

३) वित्त विभागाच्या क्रमांक: वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३, दि.०२.०३.२०१९ रोजीच्या शासननिर्णयातील परिच्छेद क्रमांक " (vi) विवक्षित सेवा कालावधीनंतर (After specified number of years of service), संबंधित पदाच्या कर्तव्ये व जबाबदारीत वाढ न होता, अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचनेचा (Non-Fuctional Pay Structure) मंजूर करण्यात आलेला/ येणारा, लाभ, हा या योजनेखालील पहिला लाभ (First benefit of MACPS) समजण्यात येईल, उदा. मंत्रालय/विधानमंडळ सचिवालय कक्ष अधिकाऱ्यांना चार वर्षाच्या सेवेनंतर देण्यात येत असलेली अकार्यात्मक वेतनसंरचना.

ज्या कर्मचारी/ अधिकारी यांना पहिला लाभ म्हणून ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे, त्या पदाला विवक्षित सेवा कालावधीनंतर, त्या पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये वाढ न होता, अकार्यात्मक व तत्सम उच्च वेतनसंरचना मंजूर करण्यात येत असेल तर ती अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचना हा दुसरा लाभ (Second Benefit of MACPS) म्हणून मंजूर करण्यात येईल." **पूर्णत: वगळण्यात आले आहे.**

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी) इत्यादी पदावरील **पदविका धारक** कर्मचाऱ्यांना विहीत सेवाकाळ पूर्ण केल्यानंतर (५ वर्षानंतर) लागू करणेत येणारी 'शाखा अभियंता' पदाची वरिष्ठ वेतनश्रेणी हा यापूर्वी सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा प्रकरणपरत्वे पहिला/दुसरा लाभ गणण्यात आलेला आहे.

त्यामुळे यापूर्वी ज्या अधिकारी/ कर्मचारी यांना दि. ०१ एप्रिल २०१० च्या शासन निर्णयातील उपरोक्त अटींच्या आधारे १२ व २४ वर्षाच्या सेवेनंतर संबंधित अटी विचारात घेऊन योजनेचा पहिला/दुसरा लाभ मंजूर केलेला आहे तसेच सातव्या वेतन आयोगात दि. ०२ मार्च २०१९ च्या शासन निर्णयातील उपरोक्त अटींच्या आधारे १०,२० व ३० वर्षाच्या सेवेनंतर पहिला/दुसरा/तिसरा लाभ पात्रतेनुसार अनुज्ञेय केले आहेत अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या पहिल्या/दुसऱ्या/तिसऱ्या **लाभाच्या दिनांकामध्ये व वेतनश्रेणीमध्ये** उपरोक्त नमुद अटी दि.२१ फेब्रुवारी, २०२४ च्या शुद्धीपत्रकान्वये रद्द केल्यामुळे **बदल करणे आवश्यक आहे.** तसेच जे अधिकारी/कर्मचारी उपरोक्त अटींमुळे योजनेच्या दुसऱ्या/तिसऱ्या लाभास अपात्र ठरले आहेत, त्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या शासन निर्णयांच्या अनुषंगाने पात्रतेनुसार पुढील पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय करणे आवश्यक आहे.

**सदर परिपत्रक संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्याची जबाबदारी आस्थापना लिपिक व विभागप्रमुख यांची राहील.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील सेवानिवृत्त, स्वेच्छा सेवानिवृत्त, राजीनामा अथवा मयत अधिकारी/कर्मचा-यांची माहिती ते ज्या विभागामधून सेवानिवृत्त झालेले आहेत त्याच विभागाने पाठविणे आवश्यक आहे. अशा अधिकारी/कर्मचारी यांची सेवानोंद पुस्तके लेखा विभागाकडून प्राप्त करून घेऊन त्यानुसार विवरण पत्र सादर करावे. त्याचप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना दिलेली नेमणूक, पदोन्नती, पहिला लाभ, दुसरा लाभ, अर्हताकारी सेवेनंतर मिळालेला वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ (उदा. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी) इत्यादी पदावरील **पदविका धारक** कर्मचाऱ्यांना विहीत सेवाकाळ पूर्ण केल्यानंतर लागू करणेत येणारी 'शाखा अभियंता' पदाची वरिष्ठ वेतनश्रेणी), शैक्षणिक अर्हता, सेवानोंद पुस्तकात

घेतलेल्या नोंदीवरुन खात्री करुनच विवरणपत्रात नमुद करावेत. एखाद्या अधिकाऱ्याचे/कर्मचा-याचे सेवानिलंबन तसेच विनावेतनी झाली असेल तर त्याचा आदेश क्रमांक, दिनांक, कालावधी तसेच एकुण विनावेतनी दिवस याची स्पष्ट नोंद घ्यावी. **सदर माहितीची विवरणपत्रे ऑनलाईन पध्दतीने पगारबील संगणक प्रणालीमध्ये सादर करण्याची सुविधा दिनांक .२२../..०८./२०२४ पासून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.**

सदरची माहिती संगणक प्रणालीद्वारे (Online) भरल्यानंतर त्याची Print काढुन विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीने (Hard copy) सामान्य प्रशासन विभागास **दि...२९.../...०८../२०२४ पर्यंत पोहच होतील** याची दक्षता घ्यावी. **सदरची Hard Copy सादर करताना त्यासोबत जोडावयाच्या कागदपत्रांच्या यादीनुसार अनुक्रमाने जोडणेत यावीत.** वेळेत माहिती न पाठविल्यामुळे अथवा उशिरा पाठविल्यास **लाभाच्या दिनांकामध्ये व वेतनश्रेणीमध्ये दुरुस्ती न झाल्यास** व इतर स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्यास अशा प्रकरणी संबंधित शाखाप्रमुख / विभागप्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८

प्रति,
सर्व संबंधित विभागप्रमुख
यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

टीप :- सदर परिपत्रक हे फक्त ज्या पदांना विवक्षित सेवा कालावधीनंतर संबंधित पदाच्या कर्तव्ये व जबाबदारीत वाढ न होता अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचनेचा लाभ लागू आहे अशा पदांच्या अधिकारी/ कर्मचारी यांनाच लागू राहील.

(उदा. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी) पदावरील **पदविका धारक** कर्मचाऱ्यांना विहीत सेवाकाळ पूर्ण केल्यानंतर लागू करणेत येणारी 'शाखा अभियंता' पदाची वरिष्ठ वेतनश्रेणी)

## नमुना माहितीसाठी

| सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना<br>अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचनेचा लाभ घेतलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी,<br>महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. वेतन-२०२३/प्र.क्र.१०/सेवा-३ दि. २१ फेब्रुवारी, २०२४ अन्वये दुरुस्ती करणेबाबत विवरणपत्र सोबत अनुक्रमे जोडावयाच्या कागदपत्रांची यादी | | |
|---|---|---|
| अ.क्र. | तपशिल | शेरा |
| १ | सेवानोंद पुस्तकाच्या पहिल्या पानाची छायांकित सत्यप्रत<br>(शैक्षणिक अर्हतेच्या सर्व नोंदी घेतल्याची खात्री करुन) | |
| २ | अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झाले असल्यास आदेशाची छायांकित सत्यप्रत | |
| ३ | प्रथम पदाच्या नियुक्ती आदेशाची छायांकित सत्यप्रत | |
| ४ | सेवानोंद पुस्तकाच्या नोंदीतील रुजू दिनांकाची छायांकित सत्यप्रत जोडणे | |
| ५ | प्रथम पदाच्या नियमित आदेशाची व सेवानोंद पुस्तकातील नोंदीची छायांकित सत्यप्रत | |
| ६ | पुढील पदावर पदोन्नती झाली असल्यास अथवा सरळसेवेने नियुक्ती झाली असल्यास आदेशाची व सेवानोंद पुस्तकातील नोंदीची छायांकित सत्यप्रत | |
| ७ | पदोन्नतीने/सरळसेवेने नियुक्ती झालेल्या पुढील पदाच्या नियमित आदेशाची व सेवानोंद पुस्तकातील नोंदीची छायांकित सत्यप्रत | |
| ८ | **पाच वर्षाचे अर्हताकारी सेवेनंतर लागू केलेल्या “शाखा अभियंता” पदाच्या वेतनश्रेणीच्या आदेशाची छायांकित प्रत जोडणे** | |
| ९ | जातवैधता प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत | |
| १० | अधिसंख्य पदावर सेवा वर्ग केली असल्यास आदेशाची छायांकित सत्यप्रत | |
| ११ | शैक्षणिक अर्हता :- वरिष्ठ पदासाठी आवश्यक असणाऱ्या शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिकांची/प्रमाणपत्रांची छायांकित सत्यप्रत. **(पदविका प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत)** | |
| १२ | संगणक अर्हता प्रमाणपत्र / संगणक सूट आदेशाची छायांकित सत्यप्रत जोडणे. | |
| १३ | विभागीय परिक्षा (व्यावसायिक परिक्षा) प्रमाणपत्र / विभागीय परिक्षा सूट आदेशाची छायांकित सत्यप्रत | |
| १४ | यापूर्वी १२/१० वर्षे पहिला लाभ लागू केल्याच्या आदेशाची व सेवानोंद पुस्तकातील नोंदीची छायांकित सत्यप्रत | |
| १५ | यापूर्वी २४/२० वर्षे दुसरा लाभ लागू केल्याच्या आदेशाची व सेवानोंद पुस्तकातील नोंदीची छायांकित सत्यप्रत | |
| १६ | यापूर्वी ३० वर्षे तिसरा लाभ लागू केल्याच्या आदेशाची व सेवानोंद पुस्तकातील नोंदीची छायांकित सत्यप्रत | |
| १७ | संपूर्ण सेवाकालावधीतील शास्ती, बडतर्फ, सेवेतून कमी, गैरहजर दिवस, पदावनत, खातेनिहाय चौकशी चालू अगर प्रस्तावितबाबत तसेच खातेनिहाय चौकशी पूर्ण झालेबाबत अथवा न्यायप्रविष्ट प्रकरणांसदर्भातील आदेशाची छायांकित सत्यप्रत | |
| १८ | लाभाच्या कालावधीतील एकूण विनावेतनी दिवसांचा तपशील | |